नि.दि.दावा. क्र. ४६/२०२३.
शकुंतला व इतर वि. सोनाबाई व इतर.
MHKO15002722023.

## निशाणी क्रमांक ४० खालील आदेश.

वादींनी प्रस्तुतचा अर्ज दि. प्र. सं. आदेश २६ नियम ९ प्रमाणे मौजे पेरणोली, ता. आजरा येथील ग्रा.पं.मि.नं. ७४९ व ७५० ची मोजणी करुन ग्रा. मि. क्र.७४९ वरती प्रतिवादी क्र.१ व २ यांनी पुर्व–पश्चिम १० फूट व दक्षिण–उत्तर २५ फूट लांबीचे केलेल्या बांधकामाची निश्चित वस्तूस्थिती पटलावरती येण्यासाठी दाखल केला आहे. वादींच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादींनी बांधकाम करुन केलेले अतिक्रमण काढून मिळण्यासाठी त्यांनी दाव्यात दुरुस्ती केलेली असून न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जाच्या शेवटच्या पानावरती म्हणणे दाखल करुन वादी मागणी करत असलेल्या मिळकतीची नगर भूमापन योजने मार्फत मालमत्ता पत्रके अथवा सरकारी मोजणीचे नकाशे तयार नसल्यामुळे अर्ज मंजूर करता येऊ शकत नसल्यामुळे तो खर्चासह फेटाळण्याची मागणी केली आहे.

३. वादी व प्रतिवादीच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्जातील व लेखी म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तिवाद केला आहे. वादीतर्फे अतिक्रमित बांधकामाचे निश्चित क्षेत्र समजण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची मागणी करण्यात आली असून प्रतिवादींच्या वतीने वादी हे केवळ पुरावा गोळा करण्यासाठी मोजणीची मागणी करत असल्यामुळे अर्ज नाकारण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीच्या विधिज्ञांच्या युक्तिवादाचे आणि दाव्यासह लेखी कैफियतीमधील कथनांचे अवलोकन केले असता, वादींनी प्रतिवादींनी केलेल्या अतिकमणा बाबत आरोप केलेले आहेत. जरी प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे, पेरणोली गावामध्ये नगर भूमापन योजनेचा अंमल झालेला नसला तरी ग्रामपंचायतीकडील नमूद क्षेत्राची बाब विचारात घेता मोजणी करता येणे शक्य आहे. त्यामुळे प्रतिवादींचा आक्षेप मान्य करता येऊ शकत नाही. वादींची मागणी मान्य केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी व प्रतिवादीमध्ये मूळ वादाचे पुर्णपणे निराकरण होण्यासाठी

पेरणोली येथील ग्रा.पं.मि.नं. ७४९ व ७५० ची मोजणी होऊन त्यामधील हद्दीची निश्चिती करुन अतिक्रमणाची बाब स्पष्ट होणे आवश्यक आहे. सदर बाब केवळ मोजणीअंती होऊ शकत आहे. तसेच वादी हे भूमि अभिलेख, आजरा यांचे नियमाप्रमाणे होणारे शुल्क देण्यास तयार आहेत. त्यामुळे वादींची मागणी विचारात घेऊन न्यायाच्या दृष्टीने हे न्यायालय खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे,

**आदेश**

१. अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, आजरा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येत असून त्यांनी पेरणोली येथील ग्रा.पं.मि.नं. ७४९ व ७५० ची नियमा प्रमाणे मोजणी करण्याकरीता नियुक्ती करण्यात येते.

३. तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, आजरा यांनी ग्रा. मि. क्र.७४९ मध्ये पश्चिम व उत्तर–दक्षिण भागात ग्रा. मि. क्र.७५० च्या धारकांनी केलेल्या अतिक्रमणाचा मोजमापासह वस्तूनिष्ठ (क्षेत्रांच्या मोजमापासह) अहवाल एक महिन्यामध्ये सादर करावा.

४. वादींनी नियमा प्रमाणे १५ दिवसांमध्ये पेरणोली येथील ग्रा.पं.मि.नं. ७४९ व ७५० च्या मोजणीसाठी आवश्यक असणारे शुल्क भरुन त्याची चलन पावती पुढील तारखे पर्यंत न्यायालयात सादर करावी.

५. वादी व प्रतिवादींनी तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, आजरा यांना पेरणोली येथील ग्रा.पं.मि.नं. ७४९ व ७५० च्या मोजणीसाठी आवश्यक असणा–या कागदपत्रांची पुर्तता करुन करुन मोजणीकामी सहकार्य करावे.

६. संबंधित लिपिकाने तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, आजरा यांच्या आदेशाच्या पुर्ततेसाठी आवश्यक असणारी कार्यवाही करावी.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

न्या. अ. सां. क्र.– महा. ०२८९७

दिनांक – १६.०३.२०२६. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.